# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com

जा.क्र. /गोंविग/कुसका/१०३५६/२०२४ दि. १६/१२/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय: क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्रातर्फे आयोजित निबंधस्पर्धेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात आनंद होत आहे की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्रातर्फे निबंधस्पर्धा जाहीर करण्यात आलेली आहे. तद्अनुषंगाने पत्रासोबत सदर निबंधस्पर्धेचे माहिती पत्रक संलग्नित करण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्रातर्फे जाहीर करण्यात आलेल्या निबंधस्पर्धेमध्ये सहभागी होण्यास प्रेरित करावे ही विनंती.

(डॉ. अनिल हिरेखन)
कुलसचिव

प्रतिलिपी:–

१) मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र–कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासनकेंद्र
द्वारा

## विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धा



निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख
28 डिसेंबर 2024




आयोजक

डॉ.रजनी वाढई

समन्वयक , क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र

आपल्याला कळविण्यात आनंद होत आहे की 03 जानेवारी 2025 ला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्य क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली येथे विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करीत आहे.या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्याचा उद्देश हाच आहे की ज्या थोर पुरुषांनी समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत समाजाला प्रकाशाची वाट दाखवत एक नवीन दृष्टीकोन निर्माण करून दिला.अशाच थोर पुरुषांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी,त्यांच्या कार्याची माहिती कळावी व त्यांच्या मध्ये समाजाविषयी जागरूकता निर्माण होऊन जबाबदारी ची भावना निर्माण व्हावी तसेच आजच्या काळात वाचनाची आवड कमी होत आहे ती पुन्हा जागृत व्हावी या उदात्त हेतूने ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे

## निबंध स्पर्धेचे विषय :

1. महात्मा ज्योतिराव फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य.
2. महात्मा फुले विचारांतील शेतकरी प्रश्न,कारणे व उपाय.
3. आधुनिक भारतातील पाहिले शिक्षणतज्ञ :ज्योतिराव गोविंदराव फुले.
4. महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणावरील कार्य.
5. महात्मा फुले यांचे भारतीय समाज व सत्यशोधक समाजातील योगदान.
6. सावित्रीबाई फुले आणि महिला सक्षमीकरण .
7. सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य
8 . सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान.
9.सावित्रीबाई फुले यांचे समाजातील योगदान.
10.सावित्रीबाई फुले यांचे साहित्य.

**पारितोषिके**

**प्रथम पुरस्कार रु 2000/-व सन्मानचिन्ह**

**द्वितीय पुरस्कार रु1500/-व सन्मानचिन्ह**

**तृतीय पुरस्कार रु1000/-व सन्मानचिन्ह**

## निबंध स्पर्धेचे नियम व अटी

1.ही निबंध स्पर्धा पदवी/ पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.
2.निबंधाची शब्द मर्यादा कमित-कमी 500 ते 1000 शब्दांमध्ये असावा.
3.निबंध ए फोर (A4 size झेरॉक्स पेपर) हस्तलिखित स्वच्छ पांढऱ्या कागदावर लिहिलेला असावा.
4.मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही भाषांमध्ये निबंध स्वीकारल्या जाईल.
5.लेखी निबंध स्वीकार केले जाईल.
6.निबंध लिहून झाल्यानंतर सगळ्यात शेवटी त्याच कागदावर आपले स्वत:चे पूर्ण नाव, वर्ग, महाविद्यालयाचे/ विभागाचे आणि विद्यापीठाचे पूर्ण नाव न चुकता लिहणे आवश्यक आहे.
7.सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जातील.
8.परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.
9.निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख 28 डिसेंबर 2024 आहे.
10. 28 डिसेंबर 2024 सांयकाली 6 नंतर आलेले निबंध स्वीकारले जाणार नाही.
11.निबंध स्पर्धेचे निकाल जाहीर होत पर्यंत स्पर्धक आपले निबंध इतर कुठेही अगदी फेसबुकवर देखील प्रकाशित करू शकणार नाही.
12.निबंधावर कोणाचा आक्षेप आल्यास त्याला स्पर्धा संयोजक जबाबदार असणार नाही.
13. विजेत्यांचा निकाल विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
14. निबंध जमा करण्यापूर्वी सर्वांनी आपली नोंदणी करावी.नोंदणी लिंक पुढील प्रमाणे आहे.

https://bit.ly/4916xIg